मासिक
# स्वराज दुनिया
संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०
■ RNI/PRGI No. : MAHMAR/2024/89748
■ DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
■ unoindia1977@gmail.com
■ वर्षे २ रे ■ अंक १० ■ डिसेंबर २०२५ ■ मुल्य : २५ रु ■ वार्षिक वर्गणी : २५० रु. ■ पान ४

## महाराष्ट्रासह सहा राज्यातून शेतकरी संघटना नेते चर्चासत्राला उपस्थित

शेतकरी आंदोलन हे स्थानिक स्तरावरून जागतिक स्तरावर करणे आवश्यक : दशरथ कुमार (राजस्थान)

ग्रामस्वराज्य सप्ताह हॉटेल ग्रँड विस्ता हॉलमध्ये पार पडला. शेतकरी समस्या ही जागतिक समस्या असून जागतिक आंदोलन करणे आवश्यक आहे, जगभरातील शेतकरी संघटित करून शेती आणि शेतकऱ्याला संपूर्ण स्वराज्य, संपूर्ण स्वातंत्र्य मिळणे आणि मिळवणे आवश्यक आहे असे मत मांडले.

केंद्र सरकार सर्वच विभागांचे खाजगीकरण करत आहे, रेल्वेचे खाजगीकरण करत आहे आणि पारंपरिक शेती, शेतकऱ्याला नियंत्रण व बंधन घालत आहे. शेतीमाल अत्यावश्यक वस्तूंमध्ये टाकून शेतकऱ्याचा आर्थिक कणा मोडत आहे, म्हणून आम्ही महाराष्ट्राच्या मागे उभे राहण्याचे ठरवले आहे, महाराष्ट्राने नेतृत्व करावे असे मत मांडले.

दयानंद पाटील (गुलबर्गा, कर्नाटक) - उत्पादन खर्चावर आधारित आणि ५० टक्के नफा ठेवून हमीभावाचे आश्वासन कोणतेच सरकार पाळत नाही, सर्व सरकारे एकाच माळेचे मणी आहेत! सर्व सरकारे शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत, ही बाब गंभीर आहे. म्हणून सरकारवर अवलंबून राहू नका, सरकार विश्वासू, फसवी सरकारे ही देशाचे भविष्य घडवणार नाहीत. उलट देश कर्जबाजारी करत आहेत, देश परावलंबी होत आहे. नवनवीन तंत्रज्ञान, नवनवीन धोरणे निर्माण करण्यासाठी देशभरातील शेतकऱ्यांनी एकत्र यावे असे आवाहन केले.





अशोक पटेल (गुजरात) - लोकशाही पार्टी - पक्ष यांच्या दलदली मध्ये फसली आहे, पार्टी पक्षांच्या चुकीच्या धोरणांच्या म्हणजे देश लुटणे - विकणे यांच्या स्पर्धेत रसातळाला गेला आहे. पक्ष पाया अरबी समुद्रामध्ये बुडविने गरजेचे आहे. उद्योजक पक्ष- पार्टी, श्रीमंत होत आहेत आणि देश कर्जात आहे ही बाब चिंताजनक आहे. सर्व शेतकरी, कष्टकरी, कामगार यांनी एकत्रित यावे असे आवाहन केले.

अमरनाथ जी, सच्चिदानंद जी - सत्य अहिंसा ग्राम स्वराज्याच्या अधिष्ठानवर आणि सर्व

संमतीने धोरण निर्माण करणे आवश्यक आहे. शेतकरी कामगार यांना फक्त श्रमाचे मोल किंमत देऊन चालणार नाही, तर त्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. आज शेतकरीच नाही तर कामगार, युवा आणि अध्यात्मिक क्षेत्रातही आत्महत्या होत आहेत. म्हणून संपूर्ण समाज व्यवस्था विस्कळीत झाली आहे. यासाठी सर्वच घटकाने एकजूट होऊन आंदोलन करणे आवश्यक आहे, असे मत मांडताना विनोबांच्या शब्दात लोकल ते ग्लोबल काम करावे लागेल असे मत मांडले.

देशभर होणाऱ्या आंदोलनात आम्ही सर्व कार्यकर्ते, शेतकरी - वारकरी समाज असे म्हणाले.

अनिल घनवट - मा. शरद जोशी यांच्या विचारावर आधारित धोरणे कायदे निर्माण करून शेतकरी

हा आर्थिक मजबूत करणे आवश्यक आहे, शेतकऱ्याना कर्ज माफी नाही तर कर्ज मुक्त करावे, पुन्हा शेतकरी कर्जात जाणार नाही, असे स्वातंत्र्य स्वराज्य त्याला मिळाले पाहिजे.

शेवटच्या दिवशी महाराष्ट्रातील अनेक नेते श्री रघुनाथ दादा पाटील (मध्य महाराष्ट्र), श्री लक्ष्मण वडले (मराठवाडा), श्री अनिल घनवट (मराठवाडा), श्री सिकंदर शहा (यवतमाळ), श्री गजानन अहमदाबादकर, श्री सतीश देशमुख, श्री अच्युत गंगणे, सौ. सीमाताई नरोडे ( उत्तर महाराष्ट्र), श्री धनंजय काकडे, श्री शिवाजी नानंदखिले, इत्यादी हजर होते. यांनी आपली मत मांडली व सर्वसंमती पुढे जाण्यासाठी नियोजनाची बैठक घेण्याचे ठरवले.

याप्रसंगी उपस्थित ग्रामविकास अधिकारी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शिक्षक, कृषितज्ञ दीपक गायकवाड, तुषार कुटे, अभिषेक देवकर, दीपक गायकवाड, दत्तू शिर्के, श्री बाळासाहेब जाधव, इत्यादि उपस्थित होते. सीमा ताई नरोडे यांनी उपस्थितांचे आभार मानून शेतकरी संघटना प्रतिज्ञा घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## शेतकरी हत्या की आत्महत्या चर्चासत्राला पुणे, मराठवाडा, विदर्भ (अमरावती, नागपूर), उत्तर महाराष्ट्र - पाच विभागांतून शेतकरी संघटना नेते उपस्थित

■ **सरकारचे धोरण हेच शेतकऱ्याचे मरण ! - शेतकरी नेते लक्ष्मण वडले**

ग्रामस्वराज सप्ताहाच्या चौथ्या दिवशी ग्रँड विस्ता हॉटेल कॉन्फरन्स हॉलमध्ये झालेल्या चर्चासत्रामध्ये माननीय लक्ष्मण वडले मार्गदर्शन करताना म्हणाले सरकारचे धोरण हेच शेतकऱ्याचे मरण व शेतकरी कर्जात असण्याचे आणि आत्महत्या करण्याचे महत्त्वाचे कारण सरकारचे धोरण आणि शेतकरी विरोधी कायदे असून शेतकरी आणि शेती यांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळालेले नाही, नवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन बाजारपेठ खुल्या करणे गरजेचे असून सरकार बंधनं घालून शेतकऱ्याला दारिद्र्यात, कर्जात ठेवण्याचे षडयंत्र करत आहे. शेतकऱ्याला प्रोत्साहन देण्याऐवजी निर्यातीवर कर लावत आहे, ही बाब शेतकऱ्याच्या आत्महत्यांमध्ये परावर्तित होत आहे. म्हणून सरकारचे धोरण हेच आत्महत्याचे मूळ कारण आहे म्हणून शेतकऱ्याची आत्महत्या नाही तर हत्या





आहे हे असे मत मांडले.

गंगणे मार्गदर्शन करताना म्हणाले की सर्वोदय सबके साथ सबका विकास हेच धोरण शेती आणि शेतकऱ्यांच्या बाबतीत असावे पण दुर्दैव आहे की शेतकऱ्याला लुटण्याचे आणि श्रीमंतांचे घर भरण्याचे सरकार काम करत आहे असे मत मांडले. अनिल घनवट (माजी अध्यक्ष शेतकरी संघटना) - मार्गदर्शन करताना म्हणाले संत तुकडोजी महाराज म्हणतात ।। गांव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा। गावाची भंगता अवदशा येईल देशा।। गावं जर सक्षम स्वावलंबी झाली तरच देश सक्षम स्वावलंबी होईल परंतु गाव, शेतकरी संपत असून गावाला शेतीला कमकुवत बनवणारी व्यवस्था धोरण बदलली पाहिजे असे मत मांडले. रघुनाथ दादा पाटील - जाती धर्माचे राजकारण करून सरकारे गावाला शेतीला शेतकऱ्यांना अप्रत्यक्ष करातून लूट करीत आहे, ही लूट थांबली पाहिजे परिणामी शेतकरी देशोधडीला लागला आहे आणखी भ्रष्टाचारामुळे सरकारचे सर्वच घटक शेतकऱ्याला लुटत कार्यक्रमामध्ये सच्चिदानंद जी (अलिगढ, उत्तर प्रदेश), गांधी विचारक अमरनाथभाई (वाराणसी, उत्तर प्रदेश), शेतकरी नेते श्री धनंजय काकडे, श्री शिवाजी नांदखिले, श्री गजानन अहमदाबादकर, श्री सतीश देशमुख, श्री सिकंदर शाह, सीमा ताई नरोडे मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. याप्रसंगी उपस्थित ग्रामविकास अधिकारी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शिक्षक, कृषितज्ञ दीपक गायकवाड, स्वराज दुनिया आणि सत्ता तंत्रचे संपादक श्री शिवाजी खेडकर, श्रीकांत वाळके, गंगाधर देशमुख, तुषार कुटे, गजानन अहमदाबादकर (वाशिम), ज्ञानदेव गायकवाड, दत्ता शिर्के, (अहिल्यानगर), रमेश बोराटे (पुणे), राम साठे (पुणे), बाळासाहेब धानोरकर, विक्रम कदम (लातूर), रावसाहेब नीचित (शिरूर), इस्माईल शेख (बीड), धनंजय पाटील (शिराळा), मनीषा पाटील (शिक्रापुर), सीमा पवार ( सनसवाडी), पंकज माळी (सांगली) नारायण पांडे (बीड), दत्तू शिर्के ( अहिल्यानगर), बाळासाहेब घाटगे इत्यादि उपस्थित होते. सीमा ताई नरोडे यांनी उपस्थिताना शेतकरी संघटना प्रतिज्ञा कार्यक्रमाची सांगता घेऊन झाली.

## 'पुणे ग्रँड टूर २०२६' आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ३५ देशांच्या सहभागाला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची मान्यता

**पुणे :** पुणे येथे १९ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'पुणे ग्रँड टूर २०२६' साठी ३५ देशांच्या प्रतिनिधींच्या सहभागाला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून तत्त्वतः ना हरकत देण्यात आली आहे.

प्रशासनाने पुढाकार घेत सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया (सीएफआय) यांच्या माध्यमातून या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन केले आहे. स्पर्धे ला आंतरराष्ट्रीय सायकल संघटना अर्थात युसीआय युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनलची (युसीआय) मान्यता मिळाली असून त्यांच्या दैनंदिनीत समाविष्ट करण्यात आली आहे.

या स्पर्धेत भारतासह अल्बानिआ, अल्जेरिया, अमेरिकन समोआ, ऑस्ट्रेलिया, बहारिन, बल्गेरिया, बुर्किना फासो, चीन, झेक रिपब्लिक, इस्टोनिया, फ्रान्स, जर्मनी, गुआम, हाँगकाँग, इंडोनेशिया, इटली, जपान, रिपब्लिक ऑफ कोरिया, मलेशिया, मालदीव्ज, मंगोलिया, मोरोक्को, नेदरलँड्स, नायजेरिया, फिलीपीन्स, सौदी अरेबिया, श्रीलंका, स्वीडन, स्वीत्झर्लंड, थायलंड, युनायटेड अरब एमिरातस्, युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका या देशांच्या नामांकन केलेल्या खेळाडू, प्रतिनिधींच्या सहभागाला तत्त्वतः ना हरकत देण्यात आली आहे. याबाबतचे पत्र परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांडून सायकलिस्ट फेडरेशन ऑफ इंडियाच्या महासचिवांना देण्यात आले आहे.

आयोजकांकडील निमंत्रण पत्र, व्हिजा विषयक नियमांचे पालन आणि आवश्यक तेथे संबंधित यंत्रणांच्याकडून मान्यता मिळण्याच्या अधीन राहून ही मान्यता देण्यात आली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने तत्त्वतः ना-हरकत दिल्याने स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलपटूंचा सहभाग वाढेल आणि उत्तम सायकलपटूंचे कौशल्य पाहण्याची संधी क्रीडाप्रेमींना मिळणार आहे.

## स्वावलंबी पिढी घडवण्यासाठी रांजनगाव गणपती ग्रामपंचायत शाळा, स्वराज दुनिया मासिक यांचा अभिनव उपक्रम

उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांनी सरकारी, निमसरकारी कार्यालयातील दिवसभराच्या कामकाजाचा घेतला अनुभव प्रशिक्षण कार्यक्रम राबावला.

रांजनगाव गणपती ग्रामपंचायत परिसरातील माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविध्यालयीन विद्यार्थी व युवकांना शासकीय कामकाजाची ओळख होऊन स्वावलंबी युवक पिढी घडविणे व अष्टपैलू व्यक्तिमहत्व बनवणे या उद्देशाने स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, निमशासकीय कार्यालये, पब्लिक ट्रस्ट तसेच सरकारी व





सहकारी बँका, रांजनगाव पोलिस स्टेशन व उपविभागीय पोलिस कार्यालय यांच्या कामकाजची विध्यार्थ्यांनी पाहणी केली.

रांजनगाव व ग्रामपंचायत कार्यालय यांनी विद्यार्थी यांना अनुभव प्रशिक्षणासाठी ग्रामसभेचा ठराव मंजूर करून सर्व सरकारी व निमसरकारी यामध्ये तलाठी कार्यालय रांजनगाव गणपती, मंडल अधिकारी कार्यालय रांजनगाव गणपती, ग्रामपंचायत कार्यालय रांजनगाव गणपती, पोस्ट ऑफिस कार्यालय, महागणपती देवस्थान ट्रस्ट कार्यालय, विविध कार्यकारी सोसायटी रांजनगाव गणपती, चखऊ पोलिस स्टेशन, उ्धडझ कार्यालय चखऊ, पीडिसीसी बँक रांजनगाव गणपती, बँक ऑफ महाराष्ट्र रांजनगाव गणपती, पंजाब नॅशनल बँक रांजनगाव गणपती, कॅनरा बँक ऑफ इंडिया रांजनगाव गणपती अशा १४ कार्यालयांना सूचना देण्यात आल्या व ७ नोव्हेंबर ला २०० विदयार्थ्यांना १० ते ५ यावेळेत सरकारी कार्यालयातील कामकाजाची माहिती कार्यालय प्रमुखांनी दिली व विदयार्थ्यांनी दिवसभर कार्यालयीन कामकाजाचा अनुभव घेऊन एक दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी ग्राम विकास अधिकारी गंगाधर देशमुख, ग्रामपंचायत चे सहायक श्रीकांत वाळके, रांजनगाव पोलिस स्टेशन चे वरीष्ट पोलिस निरीक्षक वाघमोडे आणि सामाजिक कार्यकर्ते आणि संपादक श्री शिवाजी खेडकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सदरचा उपक्रम हा स्वावलंबी व अष्टपैलू युवक घडवण्यासाठी राबवण्यात आला.

## संपादकीय

### काँग्रेस स्वबळावर!

बिहार निवडणुकीत भाजपचा दणदणीत विजय झाला तर काँग्रेसला दारुण पराभव स्वीकारावा लागला. याचे परिणाम आता राज्याच्या राजकारणावर होताना दिसत आहेत. वेगवेगळ्या स्तरांवर याबाबत चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पडसाद उमटताना दिसत आहेत. मुंबईत काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत एकत्र न लढता स्वबळावर लढण्याची आग्रही मागणी पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून होत होती. त्याला अनुसरून मुंबईत शनिवारी झालेल्या काँग्रेसच्या शिबिरात यावर शिक्कामोर्तब झाले. मुंबई काँग्रेसचे एकदिवसीय शिबिर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड उपस्थित होत्या. यावेळी प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले, बिहार विधानसभेचे निकाल उलटे लागले असते तर आजचा उत्साह अधिक वाढला असता. पण पराभव झाला म्हणून खचून जाऊ नका. काँग्रेस कार्यकर्त्यांने पुन्हा नव्या जोमाने व ताकदीने कामाला लागले पाहिजे. रडायचे नाही तर लढायचे, हा बाणा अंगी बाळगला पाहिजे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा विजयी झेंडा फडकावण्यासाठी ताकदीने कामाला लागा, असे आवाहन सपकाळ यांनी कार्यकर्त्यांना केले. मुंबई महापालिकेतील सर्व वॉर्डांमध्ये काँग्रेस उमेदवार उभे करण्याची तयारी असल्याचे मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, लक्ष्य २०२६ साठी मुंबई काँग्रेसचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर आघाडीबाबत निर्णय घ्यावा असे पक्षाने आम्हाला कळवले होते. येत्या काळात मुंबईत स्वबळावर लढले पाहिजे ही आमची भूमिका आहे. याशिवाय जे आमच्या समविचाराचे पक्ष असतील, त्यात आरपीआय गट अथवा राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याशीही आम्ही या आघाडीबाबत चर्चा करू. राजकीय वर्तुळात मात्र यावर चांगलीच चर्चा रंगली आहे. बिहारच्या निवडणुकीनंतर हा निर्णय घेतला असावा का? उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती काँग्रेसला खटकली का? यावर चर्चा होत आहे. परंतु याबाबत कुठलाही दावा अद्याप तरी काँग्रेसकडून करण्यात आलेला नाही. त्यामुळे यावेळच्या निवडणुकीत कोण कोणावर भारी पडणार ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मुंबईतील काँग्रेसच्या कट्टर समर्थकांची मते कुठेही जाणार नाहीत. मात्र मनसेला सोबत घेऊन मुंबई महानगरपालिकेची निवडणूक लढवली तर दलित, उत्तर भारतीय, मुस्लिम मतदारांच्या नाराजीला सामोरे जावे लागेल. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने घेतला असावा. काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शनिवारी याबाबतची घोषणा केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधीच महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याची चर्चा आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, मुंबई काँग्रेसचे प्रभारी यू. बी. वेंकटेश यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई काँग्रेसचे एकदिवसीय शिबिर शनिवारी मालाड येथे पार पडले. मतचोरी, मतदार यादीतील घोळ या मुद्यांवर मविआसोबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना सहभागी झाली. राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य अधिकारी यांची भेट घेण्यात आली त्यावेळी मविआसोबत मनसे अध्यक्ष राज ठाकरेही उपस्थित होते. दुसरीकडे मनसे-शिवसेना युतीची जोरदार चर्चा सुरू आहे. मनसेसोबत शिवसेनेची युती झाली आणि मनसे मविआत सहभागी झाली तर आगामी निवडणुकीत मतांवर परिणाम होऊ शकतो असा विचार करून काँग्रेसने मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला असावा असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज असावा. मविआच्या बैठकांचे सत्र सुरू असताना काँग्रेसने मुंबई महानगरपालिका निवडणुकीत 'एकला चलो रे'ची भूमिका घेतली आहे. काँग्रेस मुंबईची निवडणूक स्वबळावर लढेल. आम्ही सर्व २२७ जागा लढवू. जिल्हा काँग्रेस कमिटी, ब्लॉक काँग्रेस कमिटी आणि सर्व पदाधिका-यांची ही निवडणूक स्वबळावर लढण्याची इच्छा होती. त्यांच्या इच्छेचा मान राखत आम्ही हा निर्णय घेतला. ही स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक आहे. त्यामुळे या निवडणुकीत स्थानिक पातळीवरचे कार्यकर्ते जे म्हणतील तेच होईल. भविष्यात काँग्रेसला मजबूत बनवणे हे आमचे काम आहे. काँग्रेस मजबूत व्हावी अशी आमच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्या भावनांचा मान राखत हा निर्णय घेतला आहे, असे चेन्नीथला म्हणाले. मविआमध्ये आम्ही किमान समान कार्यक्रमावर चालण्याचा प्रयत्न केला. हा कार्यक्रम सर्वांसाठी असला पाहिजे, संविधानाच्या धाग्यातून असला पाहिजे परंतु काही पक्षांची भूमिका ही मारहाणीची, लोकांना त्रास देण्याची राहिली आहे. त्यामुळे काँग्रेस पक्ष म्हणून आम्ही त्यांच्यासोबत जाऊ शकत नाही. उद्धव ठाकरे यांचा स्वतंत्र पक्ष आहे. त्यांनी त्यांचा योग्य तो निर्णय घ्यावा. पण सध्या ते ज्या लोकांशी चर्चा करत आहेत, त्यांच्याशी आमचे कितपत जमेल ते आम्हाला माहिती नाही, असे काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष पदाधिका-यांना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. अनेक ठिकाणी पक्षप्रवेश सोहळे पार पडत आहेत. अशात काँग्रेसमध्ये कुठेही बंडखोरी होणार नाही, असा विश्वास काँग्रेस नेते नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे. बिहारमध्ये झालेला -हास पाहून काँग्रेसच्या नेत्यांनी बोध घ्यावा, तरीही त्यांना स्वबळावर निवडणूक लढवायची असेल तर लढवावी. त्यांना कोणी थांबवू शकत नाही असेही राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## आला थंडीचा महिना

यंदा वातावरणीय बदलामुळे पाऊस बराच लांबला होता. त्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातल्याने हिवाळा थोडा उशिरा सुरू झाला. आता मात्र कडाक्याची थंडी पडली आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये लोक गुलाबी थंडीचा अनुभव घेऊ लागले आहेत. राज्यात एकीकडे थंडीचा प्रभाव वाढत असताना प्रदूषणाची पातळीही वाढत आहे. सर्वच प्रमुख शहरांमध्ये ही प्रदूषण पातळी स्थानिक नागरिकांसाठी घातक असून निर्धारित मानकांपेक्षा हे निर्देशांक अधिक असल्याचे दिसून येत आहे. राज्यात गत काही दिवसांपासून थंडीचा कडाका वाढत असून तापमानात सातत्याने घट होत आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. आता अनेक ठिकाणी गारठा वाढला आहे. वातावरणातील बदलामुळे लोकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. ऐन नोव्हेंबरमध्ये काही ठिकाणी कडाक्याची थंडी पडल्याने सकाळी व रात्रीच्या वेळी शेकोट्या पेटत आहेत. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात आधीच कमी तापमान नोंदवले गेले असताना तापमानाचा पारा आणखी खाली जाण्याची शक्यता आहे.

वातावरणातील बदलामुळे विविध आजार बळावले असून रुग्णसंख्येत वाढ होत आहे. थंडीमुळे न्युमोनिया, सर्दी, खोकला, कावीळ, दमा, त्वचेवर खाज असे विविध आजार बळावले आहेत. वातावरणातील बदलानंतर थंडीचा प्रभाव सर्वांत आधी होतो तो आपल्या त्वचेवर. त्वचा कोरडी पडणे, ओठ फाटणे, पायांच्या चिरांत वाढ, त्वचा लाल होणे अशा समस्या सुरू होतात. या सर्वांवर वेळीच उपचार न केल्यास त्वचेचे नुकसान होऊ शकते. थंडी वाढल्याने अनेकांचे कपाटात गेलेले स्वेटर, कानटोप्या पुन्हा बाहेर निघू लागल्या आहेत. सध्या राज्यासह देशभरात थंडी वाढल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढला असून उत्तरेकडील थंड वारे राज्याच्या दिशेने वाहत असल्याने बहुतांश भागात किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यातील किमान तापमान २ ते ८ अंश सेल्सिअसने घसरले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात गुलाबी थंडीची लाट पसरली आहे. हिवाळ्याचा तडाखा वाढल्याने जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे. सकाळी दाट धुक्याची चादर पसरत असल्याने दृश्यमानतेतही घट होत आहे. रस्त्यावरील वाहतूकही मंदावत आहे. रस्त्यावर सकाळी आणि रात्री फारच कमी नागरिक दिसत आहेत. शालेय मुलांना थंडीचा सर्वाधिक त्रास होत असल्याने अनेक ठिकाणी शाळा उशिरा सुरू करण्याची मागणी पालक करीत आहेत. मुंबईकरही थंडीची हुडहुडी अनुभवत आहेत.

मुंबई, उपनगर, ठाणे, पालघर, नवी मुंबई आणि रायगडमध्येही थंडीचा कडाका वाढला आहे. पहाटेच्या वेळी नागरिकांना गुलाबी थंडीचा अनुभव येत आहे. पुणेकरांना देखील थंडी जाणवू लागली आहे. अनेक ठिकाणी पहाटेच्या वेळी शेकोट्या पेटल्याचे दिसून येत आहे.

उत्तर भारतातील हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरमध्ये थंडीचा कडाका वाढत असतानाच महाराष्ट्रावरही या शीतलहरींचा परिणाम झाला आहे. विशेषत: उत्तर महाराष्ट्रात तापमानाने निचांकी आकडा गाठला असून विदर्भ आणि कोकणही या थंडीच्या लाटेत सापडला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यात थंडीचा कडाका वाढत असून पारा दिवसागणिक घटताना दिसत आहे. मुंबई शहर व उपनगरात पहाटेच्या वेळी तापमानात घट होत असून दुपारच्या वेळी मात्र प्रचंड उष्मा जाणवत आहे. केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार पुढील ४८ तासांत दक्षिण भारतात पावसाची हजेरी लागू शकते.

केरळ, तामिळनाडू, अंदमान-निकोबार बेट समूह आणि लक्षद्वीपच्या बहुतांश भागात पाऊस होऊ शकतो. पूर्वोत्तर भारतातील अरुणाचल प्रदेश आणि नजिकच्या भागातही पावसाची शक्यता आहे. मेघालयातील काही भागात पाऊस तर डोंगराळ भागात थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता आहे. काश्मीर खोरे, गुलमर्ग, पहलगाम, श्रीनगर येथे बर्फवृष्टी सुरू असल्याने तापमान शून्याच्याही खाली गेले आहे. हवामान विभागाने या भागासाठी १६ नोव्हेंबरनंतर नव्याने पश्चिमी झंझावात सक्रिय होणार असल्याचा इशारा दिला आहे. हिमाचल प्रदेशात थंडीचा कडाका वाढल्याने दुर्गम भागात राहणा-यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला आहे. पर्यटकांसाठी मात्र कडाक्याच्या थंडीचा अनुभव आनंददायी असू शकतो. उत्तर भारतातील शीत लहरींच्या प्रभावामुळे उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि कोकणात तापमान कमी होत चालले आहे. पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर आणि घाटमाथा परिसरात कोरडे हवामान राहील. मराठवाड्यात कमाल तापमान ३१ अंश आणि किमान तापमान ११ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे.

जालना, परभणी, बीड, हिंगोली, लातूर, नांदेड, धाराशिव जिल्ह्यांतही कोरडे वातावरण राहून तापमानात घट होईल असा अंदाज आहे. राज्यात सर्वत्र तापमानात घट होत असून थंडीचा जोर दिवसेंदिवस वाढत आहे. पुढील काही दिवसांत तापमान आणखी खाली जाण्याची शक्यता असून थंडीचा कडाका वाढेल. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची आणि थंडीपासून बचावाची विशेष काळजी घ्यावी. संपूर्ण राज्यात दिवसा उन्हाची तीव्रता जाणवेल. मात्र रात्री आणि पहाटे गारठा मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. कृषी विभागाने वाढत्या गारठ्याच्या पार्श्वभूमीवर तूर पिकाची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. थंडीचा ऋतू आवडणार नाही असा माणूस अपवादानेच आढळेल. मॉर्निंग वॉक, व्यायाम करण्याचा आनंद थंडीच्या दिवसांत द्विगुणित होतो. गरमागरम चहा, थंडीतले ऊबदार कपडे, शेकोट्या, आल्हाददायक आणि मन प्रसन्न करणारे वातावरण म्हणजे थंडीचे दिवस. अशा या थंडीचा आनंद घेण्यासाठी झटपट शेकोट्या पेटवा!

## सुनावणी पुढच्या वर्षी !

गत तीन वर्षांपासून प्रलंबित असलेली शिवसेना, राष्ट्रवादी पक्ष व चिन्हाबाबतची सुनावणी आता पुढच्या वर्षी म्हणजे २१ जानेवारीला सुप्रीम कोर्टात होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी शिवसेना पक्ष आणि पक्षाचे चिन्ह याबाबत सर्वोच्च न्यायालयात फैसला व्हावा यासाठी प्रयत्न करणारे शिवसेना पक्षप्रमुख (उबाठा) उद्धव ठाकरे यांना बुधवारी जोरदार धक्का बसला. गत तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणाची अंतिम सुनावणी बुधवारी होणार होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा ही सुनावणी पुढे ढकलली आहे. आता २१ जानेवारी २०२६ रोजी या प्रकरणी सुनावणी घेण्यात येणार आहे. निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदेंच्या बाजूने निकाल देत शिवसेना पक्ष आणि चिन्ह त्यांना बहाल केले होते. त्याला उद्धव ठाकरे यांच्याकडून सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले. केंद्रीय निवडणूक आयोगाचा निर्णय पूर्णपणे असंवैधानिक आणि पक्षपाती असल्याचा आरोप ठाकरे गटाने केला आहे.

उद्धव ठाकरेंच्या बाजूने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल कोर्टात बाजू मांडत आहेत. या आधीच्या सुनावणीत आमदारांच्या अपात्रतेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार कोर्टाने विधानसभा अध्यक्षांना दिला होता. विधानसभा अध्यक्षांनी सुनावणी घेत दोन्ही पक्षांची बाजू ऐकून निकाल दिला. यावेळी दोन्ही गटांच्या आमदारांना पात्र ठरवण्यात आले. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना नाव आणि चिन्हाबाबत घेतलेल्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांच्याकडून सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले आहे. न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होत आहे. शिवसेनेसोबतच राष्ट्रवादी काँग्रेसच्या नाव आणि चिन्हावरही विचार करण्यास खंडपीठाने सहमती दर्शवली आहे. या प्रकरणातील कायदेशीर मुद्दे समान असून ते एकमेकांवर अवलंबून असल्याचे निरीक्षण कोर्टाने नोंदवले. त्यामुळे आता या दोन्ही खटल्यांची एकत्रित सुनावणी घेतली जाणार आहे.

आता या दोन्ही खटल्यांची सुनावणी २१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता सुरू होईल. त्याशिवाय २२ जानेवारी रोजी कुठलेही अन्य महत्त्वाचे खटले ठेवू नयेत, असे कोर्टाने निर्देश दिले आहेत. त्यामुळे २१ आणि २२ जानेवारी २०२६ या दोन्ही दिवशी सुनावणी राहील. २०२४ ते २०२५ या काळात कलम ३७० वरील खटल्यांमुळे वारंवार सुनावणीला विलंब झाला. अनेक वेळा या खटल्याची तारीख पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर १४ जुलै २०२५ रोजी उद्धव ठाकरे यांच्या वतीने सुप्रीम कोर्टात अर्ज करून तातडीची सुनावणी करण्याची मागणी करण्यात आली. पण कोर्टाने ऑगस्ट महिन्यात सुनावणी घेऊ असे सांगितले. ८ ऑक्टोबर २०२५ रोजी पुन्हा ठाकरेंच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तातडीने सुनावणीची मागणी करण्यात आली, तेव्हा १२ नोव्हेंबरची तारीख देण्यात आली. मात्र, १२ नोव्हेंबर रोजी सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण जानेवारी २०२६ पर्यंत पुढे ढकलले. विशेष म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ च्या आधी पूर्ण करा, असे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत.

त्यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी हे प्रकरण निकाली लागेल का, याबाबत प्रश्नचिन्ह आहे. ८ ऑक्टोबर २०२२ रोजी निवडणूक आयोगाने शिंदे-ठाकरे या दोन्ही गटाला 'धनुष्यबाण' वापरण्यास बंदी घातली होती. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोगाने धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे यांना तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला 'मशाल' हे नवे चिन्ह दिले. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी सुप्रीम कोर्टाने आयोगाच्या निर्णयावर स्थगिती देण्यास नकार दिला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने २१ जानेवारी रोजी सुनावणी ठेवल्याने लवकरात लवकर निर्णय देण्याची मागणी करणा-या ठाकरेंच्या शिवसेनेने नाराजी व्यक्त केली. मात्र, दुसरीकडे शरद पवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. शरद पवार गटाला लोकसभा, विधानसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाला साधर्म्य नाव असणा-या पिपाणी (ट्रम्पेट) चिन्हामुळे फटका बसला होता. पिपाणी हे चिन्ह गोठविण्याची मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून करण्यात येत होती.

अखेर निवडणूक आयोगाने ही मागणी मान्य करत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पिपाणी हे चिन्ह वगळले आहे. शिवसेनेबरोबरच राष्ट्रवादीचीही सुनावणी होणार असून ती सलग दोन दिवस चालेल. त्यामुळे जे काही होईल ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतरच हे स्पष्ट झाले आहे. शिवसेनेच्या प्रकरणासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष आणि चिन्हाचे प्रकरण न्यायालयाने एकत्रित सुनावणीसाठी सुचिबद्ध केले होते. दोन्ही प्रकरणांवर बुधवारी सकाळी सुनावणीला सुरुवात झाली. उद्धव ठाकरे यांच्यातर्फे ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी बाजू मांडली. त्यांनी महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे लक्ष वेधले आणि प्रकरणाची तातडीने सुनावणी घेण्याबाबत विनंती केली. मात्र, खंडपीठाने तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला आणि २१ व २२ जानेवारीला पुढील सुनावणी निश्चित केली. २१ जानेवारीला सकाळी ११.३० ला शिवसेनेच्या याचिकांवर अंतिम युक्तिवाद ऐकण्यास सुरुवात केली जाईल. २२ जानेवारीला राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष व चिन्हाच्या प्रकरणाची सुनावणी घेतली जाईल. सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेनंतर शिवसेना खासदार अनिल देसाई म्हणाले, लोकशाहीचे सर्व दरवाजे आम्ही ठोठावले आहेत. सुप्रीम कोर्ट अतिउच्च असून ते न्याय करतील, याचा आम्हाला आजही विश्वास आहे. सुनावणीदरम्यान महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मुद्दा उपस्थित होताच न्यायालयाने राजकीय पक्षांबाबत टिप्पणी केली. देशातील राजकीय पक्ष नेहमीच निवडणूक मोडवर असतात, कारण ते राष्ट्रीय निवडणुका, राज्य पातळीवरील निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकादेखील लढवत आहेत, अशी टिप्पणी खंडपीठाने केली. त्यामुळे आता २१ जानेवारीची वाट पाहण्याशिवाय पर्याय नाही.


**printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR**

**मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र).**

**संपादक : शिवाजी बबन खेडकर**

# नवले पूल अपघातानंतर महापालिकेचा मोठा निर्णय!

■ **'रम्बल स्ट्रिप' बसविणार**

**पुणे :** नवले पूल परिसरात होत असलेल्या अपघातांच्या घटनांना आळा घालण्यासाठी महापालिकेने पावले उचलली आहेत. कात्रज नवीन बोगदा ते नवले पूल या दरम्यान वाहनांचा वेग मर्यादित रहावा, यासाठी 'रम्बल स्टिप' बसविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

या रस्त्यावर प्रत्येक पाचशे मीटर अंतरावर चांगल्या दर्जाच्या रम्बल स्टिप बसविण्यात येणार आहेत. यामुळे या भागात होणाऱ्या अपघातांना आळा बसेल, असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला. नवले पुलावर दोन दिवसांपूर्वी झालेल्या अपघातामध्ये आठ जणांना मृत्यू झाला होता. साताऱ्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून आणि ब्रेक नादुरुस्त झाल्याने नवले पुलाजवळ गुरुवारी भीषण अपघात झाला. या कंटेनरने १० ते १२ वाहनांना धडक दिल्यामुळे लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर ९ ते १० जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. या दुर्घटनेनंतर या भागातून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या रस्त्यावर तीव्र स्वरूपाचा उतार असल्याने प्रत्येक महिना-दोन महिन्यांनी या रस्त्यावर अपघात होतात. काही महिन्यांपूर्वी नवले पूलाजवळ झालेल्या अपघातामध्ये अनेकांना जीव गमवावा लागला होता.

नवले पूलाजवळ झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, वाहतूक पोलिस अधिकारी



यांची शुक्रवारी महापालिकेत बैठक झाली. या बैठकीला महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

नवले पूलाजवळ असलेल्या तीव्र उतारामुळे अवजड वाहनांचे वेगावर नियंत्रण राहत नाही. त्यामुळे बहुतांश अपघात होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या रस्त्यावर पाचशे मिटर अंतरावर वाहनांचा वेग नियंत्रित ठेवण्यासाठी रम्बल स्ट्रिप बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

आयुक्त राम म्हणाले, या रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी तीन टप्प्यात उपाययोजना केल्या जाणार आहेत. यामध्ये एलईडी फलक बसविणे, वेगाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करणे, वाहनांचा वेग ६० किलोमीटर वरुन ४० किलोमीटरवर आणणे. वेग मोजण्याची यंत्रणा, कॅमेरे या रस्त्यांवर बसविण्याचे नियोजन करणे. तसेच बेकायदा पद्धतीने वाहने रस्त्यांवर उभी करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. त्याबाबत आवश्यक त्या सूचना वाहतूक पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी त्यांच्या कर्मचाऱ्यांना देणार आहेत.

# पुणे जिल्ह्यातील २५ विद्यार्थी नासा येथे अभ्यासदौऱ्यासाठी रवाना

**पुणे :** पुणे जिल्हा परिषद शाळांमधील ग्रामीण भागांतील २५ गुणवंत विद्यार्थ्यांची १० दिवसांच्या अमेरिकेतील शैक्षणिक दौऱ्यासाठी निवड झाली आहे. विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी विद्यार्थ्यांच्या चमूला प्रवासासाठी शुभेच्छा देत दौऱ्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्य विकसित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू तसेच शिक्षक व पालक उपस्थित होते.

यावेळी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार म्हणाले, अमेरिकेतील नासा येथे भेट देण्याची ही खूप मोठी संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळाली असून ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.अमेरिकेतील शिस्त आणि शिष्टाचाराचे अत्यंत काटेकोरपणे पालन करा, अनोळख्या वस्तूला हात लावू नका, एकमेकांना मदत करा, सर्वांनी एक संघ रहा, शिक्षकांच्या सूचनांचे पालन करा, तब्येतीची काळजी घ्या अशा सूचना दिल्या. देशाला बळकट करण्यासाठी अभ्यास दौऱ्याचा उपयोग करा असे सांगून वारंवार विदेश दौरे करायला मिळावेत, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

या शैक्षणिक दौऱ्यात विद्यार्थी नासा केनेडी स्पेस सेंटर, स्मिथसोनियन नॅशनल एअर अँड स्पेस म्युझियम, नासा अर्थ इन्फॉर्मेशन सेंटर, तसेच सॅन फ्रान्सिस्कोमधील प्रमुख तंत्रज्ञान कंपन्या यांना भेट देणार आहेत. शिष्टमंडळ १५ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे मुंबई येथून प्रस्थान करणार आहे. या दौऱ्यात इयत्ता ६ वी व ७ वी मधील ९ मुली व १६ मुलांचा समावेश असून त्यांच्यासमवेत आयुकाचे शास्त्रज्ञ समीर दुर्डे, शिक्षिका माया लंघे (हवेली), प्रमिला जोरी (आंबेगाव), सुनीता खलाटे (बारामती), तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला साळुंके (दौंड) यांचा समावेश आहे.तर या प्रकल्पाची अंमलबजावणी आयुकाच्या सहकार्याने करण्यात येत आहे. या उपक्रमाला ग्रामीण विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, १७,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. निवड प्रक्रिया तीन टप्प्यांमध्ये काटेकोरपणे पूर्ण करण्यात आली.

नासाला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयुकाने विशेष तयारी वर्गांचे आयोजन केले, ज्यामध्ये वैज्ञानिक विषय, आंतरराष्ट्रीय संशोधन पद्धती आणि अवकाश विज्ञान संकल्पना यांची ओळख करून देण्यात आली. तसेच, आयुकाने शिक्षकांसाठीही प्रशिक्षणकार्यक्रम घेतले असून, त्याद्वारे शिक्षकांना अन्वेषण-आधारित शिक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वर्गात प्रभावीपणे आणण्याच्या पद्धती शिकविण्यात आल्या आहेत.

# डिझेल, पेट्रोल व पेट्रोलियमसदृश द्रव पदार्थांची अनधिकृत साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुध्द कडक कारवाई

**मुंबई :** मुंबई ठाणे शिधावाटप यंत्रणेच्या भरारी पथकामार्फत टागोर नगर, गुरुद्वाराजवळ, विक्रोळी (पूर्व), मुंबई या ठिकाणी डिझेल, पेट्रोल व पेट्रोलयमसदृश द्रव पदार्थाची अनधिकृत साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पेट्रोल व डिझेलचा अंदाजित साठा १४,७९५ लिटर्स व टेम्पो असा एकूण रुपये ३३,५१,७१९/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई कार्यालयाने प्रसिद्धीपत्राद्वारे दिली आहे.

या प्रकरणी जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत कारवाई करुन संबंधित दोषींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात पेट्रोल, डिझेल, पेट्रोलियम द्रव पदार्थ यांचे वितरण सुरळीत होणे तसेच त्यामध्ये कोणताही गैरप्रकार होणार नाही याकरीता नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे मार्गदर्शनाखाली दक्षता पथक गठित करण्यात आलेले आहे. या दक्षता पथकामार्फत जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

९ नोव्हेंबर २०२५ रोजी टँकर क्रमांक चक ४३ उए ६२७८ चे सील काढून अवैधरित्या टँकरमधील पेट्रोल काढून स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी काळ्याबाजारात परस्पर विक्री करत असल्याचे प्रथम दर्शनी स्पष्ट होत असल्याने अधिकारी व पंचासमक्ष केलेल्या कारवाईमध्ये टँकरचालक लालबहादुर रामनयन हरजन, टँकर क्लिनर पिंटू गौतम व सुखविंदर सिंग अजितसिंग सैनी व टँकर क्रमांक चक ४३ उए ६२७८ चे मालक यांचेविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत (गुन्हा नोंद क्र ०५९४/२०२५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

## हिंजवडीत कॉल सेंटरवर पोलिसांचा छापा

**पिंपरी :** अमेरिकेतील नागरिकांची फसवणूक करणाऱ्या दोन अनधिकृत कॉल सेंटरचा सायबर पोलीस आणि गुन्हे शाखा दोनने पर्दाफाश केला आहे. लोनसाठी क्रेडिट स्कोर चांगला करून देण्याचा बहाण्याने अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जायची. याप्रकरणी कॉल सेंटर मालक आणि मॅनेजर विरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही कॉल सेंटरमधून २० हार्ड डिस्क आणि तीन लपटॉप जप्त करण्यात आले आहेत.

टेकला सोल्युशन कॉल सेंटरचा मालक धंनजय साहेबराव कासार, मॅनेजर हर्षद शंकर खामकर आणि स्काय सोल्युशनचा मालक सागर कुमार यादव, मॅनेजर आनंद पंकज सिन्हा यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे. चौघांना न्यायालयाने १८ नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

आयटी हब असलेल्या हिंजवडीतील फेज दोनमध्ये गेरा इमारतीत दोन्ही अनधिकृत कॉल सेंटर सुरू होते. ते थेट अमेरिकेतील नागरिकांशी संवाद साधायचे. अमेरिकेतील नागरिकांशी कस बोलायचं? कसा संवाद साधायचा यासाठी एक स्क्रिप्ट तयार करण्यात आली होती. तिथल्या नागरिकांचा डेटा संबंधित दोन्ही कॉल सेंटरकडे आढळून आला आहे. त्या डेटाद्वारे तिथल्या नागरिकांशी संवाद साधून लोन मिळवून देण्याच्या आमिषाने त्यांची फसवणूक केली जायची. कम्युनिटी चॉईस फायनान्सीयल कंपनीतून बोलत असल्याचं सांगून लोनसाठी क्रेडिट स्कोर सुधारून देण्यात येईल, अस अमिश दाखवून त्यांच्याकडून वेगवेगळ्या कंपनीचे कुपन घेऊन ते डॉलरमध्ये बदलून घेत. दुसऱ्या पद्धतीने देखील अमेरिकन नागरिकांची फसवणूक केली जात होती.

# महिला सक्षमतेसाठी आकुर्डीत 'सखी आंगण'ची निर्मिती

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेने आकुर्डीत उभारलेल्या खाद्यपदार्थ केंद्रातील ४९ गाळ्यांचे महिला बचत गटांना वाटपासाठी ई-लिलाव घेतला. या केंद्राला 'सखी आंगण' नाव दिले असून, त्याचे प्रतीकचिन्ह (लोगो) निश्चित केले आहे. या केंद्राचे संचालन शहरातील महिला बचत गटांमार्फत केले जाणार आहे. महिला बचत गटांमार्फत खाद्यपदार्थ, हस्तकला आणि वस्त्रनिर्मिती व्यवसायाच्या विक्रीतून दरमहा दहा लाखांहून अधिक उलाढाल अपेक्षित असल्याचे समाजविकास विभागाने सांगितले.

समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनेंतर्गत आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरात खाद्यपदार्थ विक्री केंद्रे उभारण्यात आली आहेत. या आधुनिक इमारतीतील सर्व ४९ गाळे महिला बचत गटांना खाद्यपदार्थ विक्री व व्यवसायासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी भाडेकराराने ई-लिलावाद्वारे गाळे दिले जाणार आहेत. प्रतिगाळा १५ हजार १०० ते ३२ हजार रुपयांपर्यंत लिलाव दर नोंदविले. एकूण ४९ पैकी दोन गाळे अपंग महिला बचत गटांसाठी, एक गाळा तृतीयपंथी गटासाठी, एक गाळा करोना योद्धा महिला गटासाठी, दोन गाळे आदिवासी गटांसाठी, तीन गाळे दीनदयाळ अंत्योदय योजनेंतर्गत गटांसाठी आणि उर्वरित ४० गाळे पीसीएमसी सक्षम अंतर्गत नोंदणीकृत महिला बचत गटांसाठी देण्यात आले.

खाद्यपदार्थ केंद्राच्या सुशोभीकरण आणि जाहिरातीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विशेष हॅकेथॉन स्पर्धा घेण्यात आली. डिझायनिंग आणि मार्केटिंग क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कल्पकतेतून इमारतीचे आकर्षक सुशोभिकरण केले. खाद्यपदार्थ केंद्राला 'सखी आंगण' हे नाव दिले आहे. शहराच्या ऐतिहासिक वारशाचे दर्शन घडविणारे, तसेच महिलांसाठी कार्य केलेल्या समाजसुधारकांची माहिती देणारे फलक लावण्यात आले आहेत.

# महाराष्ट्रातील खासगी प्रसूती रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाचा 'लक्ष्य-मान्यता' उपक्रम

**मुंबई :** राज्यातील खासगी प्रसूती रुग्णालयांमध्ये सेवा गुणवत्ता वाढवून प्रसुतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लक्ष्य-मान्यता हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

हा उपक्रम राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांमध्ये दर्जात्मक, सुरक्षित आणि आदरयुक्त प्रसूती सेवा सुनिश्चित करण्यासाठी राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने मागील काही वर्षांत मातामृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली असून, आता हा प्रयत्न खासगी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आला आहे.

लक्ष्य-मान्यता कार्यक्रमाचा मुख्य हेतू प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकांचे मृत्यूदर कमी करणे, खासगी रुग्णालयांमधील सेवा गुणवत्ता, रुग्ण सुरक्षा आणि रुग्ण काळजीत सुधारणा करणे, प्रत्येक महिलेला सुरक्षित व आदरयुक्त प्रसूती अनुभव मिळवून देणे आहे.

हा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॉकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया आणि गहळिशसे या आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

# मोबाइल हॅक केला आणि बँक खात्यातून पैसे काढले

**पिंपरी :** एका सेवानिवृत्त व्यक्तीचा मोबाइल हॅक करून अज्ञात व्यक्तीने त्यांच्या बँक खात्यातून सात लाख ७९ हजार रुपये काढून ऑनलाइन फसवणूक केली. ही घटना संत तुकारामनगर येथे उघडकीस आली. याबाबत ७१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञाताच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अज्ञात व्यक्तीने फिर्यादी यांना फोन करून त्यांची सर्व माहिती मिळवली. त्यानंतर त्यांचा मोबाइल हॅक करून फिर्यादींचा मोबाइल नंबर लिंक असलेल्या बँक खात्यातून सात लाख ७९ हजार रुपये काढून घेतले. त्यांची ऑनलाइन फसवणूक केली. संत तुकारामनगर पोलीस तपास करत आहेत.

बनावट ट्रेडिंग पद्वारे एका व्यक्तीची ७२ लाख ६४ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची घटना भोसरी येथे ऑनलाइन पद्धतीने घडली. या प्रकरणात ४० वर्षीय व्यक्तीने भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रत्येक जिल्ह्यात पत्रकारांसाठी 'एआय' प्रशिक्षण कार्यशाळा घेणार

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांची घोषणा

**मुंबई :** प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आणि त्याचे महत्व लक्षात घेऊन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक कार्यशाळा हा नवा उपक्रम राबवला राबविण्यात येत असून कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात पत्रकारांसाठी विशेष एआय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.



रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालय येथील पत्रकार कक्षात एआय संदर्भात चार दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. समारोप कार्यक्रमात रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर, एआय तज्ज्ञ किशोर जशनानी, उपकुलसचिव राजेंद्र तलवारे, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दिपक भातुसे, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे प्रशिक्षक लोमेश नारखेडे, सल्लागार गजानन हेगडे, वरिष्ठ सल्लागार आशिष श्रीवास्तव, प्रशासकीय सहाय्यक ऋषी देठे, शॉर्ट टर्म कोर्सेसचे शुभम शेंडे, श्रावणी कोचरे, भूषण पवार तसेच प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल माध्यमांचे पत्रकार उपस्थित होते.

११ ते १४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान मंत्रालयात आयोजित या कार्यशाळेत एआय साधनांचा पत्रकारितेसाठी वापर, वृत्ताची पडताळणी, माहिती शोधण्याची गती, तसेच डिजिटल कामकाजातील अचूकता आणि सुलभता याविषयी पत्रकारांना मार्गदर्शन मिळाले. या प्रशिक्षणाला पत्रकारांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता हा उपक्रम राज्यभर नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हा व तालुका स्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांना आधुनिक एआय साधनांची ओळख आणि त्यांचा वापर प्रत्यक्ष शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या निर्णयाबद्दल कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले, आज प्रत्येक पत्रकारावर बातमीच्या वेगासोबतच तिची अचूकता टिकवण्याची जबाबदारी वाढली आहे. अशावेळी एआय ही केवळ तांत्रिक सुविधा नाही, तर कामाला नवी धार देणारे साधन आहे.

# पत्रकारिता, न्यायव्यवस्था, निवडणूक व्यवस्था आणि सुधारणा

# ग्रामस्वराज सप्ताहाच्या निमित्ताने चर्चासत्राचे आयोजन

भाजीच्या देठाला, गवताच्या काडीला हात लाऊ नये, नुकसान झाल्यास नुकसान भरपाई

देणारा राजा आणि देणारी आदर्श राज्यपद्धती : निवृत न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील

अंधश्रद्धा आणि जुन्या वाईट रूढी परंपराप्रमाणेच स्वातंतरोत्तर व्यवस्थाही लुटारुच. आजही शेतकरी, कामगार छत्रपतींच्या आदर्श राज्यपद्धतीच्या प्रतिक्षेत. गावांना शेतकऱ्यांना संपूर्ण स्वराज्य स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय स्वावलंबी गाव निर्माण होणार नाही, स्वावलंबी गावाचे विचारसरणीतूनच न्याय पत्रकारिता निवडणुका यांची उत्तम व्यवस्था जन्माला येईल. आज जनतेमध्ये न्यायपालिका निवडणुका पत्रकारिता याबाबत विश्वासहर्ता संकटात आली आहे ही बाब चिंताजनक आहे.

सचिदानंद जी (निसर्गोपचार तज्ज्ञ) - मार्गदर्शन करताना ते असे म्हणाले जगातील कोणताच जीव अन्नग्रहण करताना अन शिजवून किंवा आगीवर भाजून खात नाहीत आणि म्हणूनच त्यांना उत्तम आणि भरपूर आयुष्य मिळते, म्हणून माणसाला सदृढ आणि सतायुषी व्हायचे असेल तर नैसर्गिक कच्चा जसा आहे तसा आहार घ्यावा हाच सदृढ आणि शतायुषी आयुष्याचा उपाय आहे.

कोणतेही बियाणे शिजवल्या व भाजल्या नंतर ते मृत होते ते जमिनीत टाकल्यावर त्याची उगवण होत नाही कारण शिजवणे किंवा भाजल्यामुळे त्यातला जीव आणि चैतन्य संपत जाते मनुष्याने जीव नसलेला किंवा मृत अन्नाचे सेवन करू नये.

लहानु कटके (केंद्रीय औद्योगिक न्यायधीकरण, महाराष्ट्र-गोवा) - न्यायव्यवस्थेबाबत मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांच्या विद्यार्थ्यांनी




कसा अभ्यास करावा यासाठी मार्गदर्शन केले.

अशोक पटेल ( गुजरात, पक्षमुक्त भारत चे अध्यक्ष ) - मार्गदर्शन करताना म्हणाले वर्तमान स्थितीमध्ये निवडणूक व्यवस्थेवर जनतेचा असलेला रोष पाहत दलमुक्त लोकतंत्र, पक्षमुक्त लोकशाही हा पर्याय असो शकतो. सत्ता मिळवण्याच्या स्पर्धेमध्ये पक्ष आणि पाया आणि त्यांच्या पदाधिकारी आणि निर्माण होणारी सरकारे यांना संविधान व संविधान उद्देशिका यांचा विसर पडल्याचे दिसून येते. म्हणून पक्ष आणि पार्टी बाजूला ठेवून व्यक्ती आणि नागरिकांचे सरकार निर्माण झाल्यास पक्षमुक्त सरकार पक्षमुक्त लोकशाही हा एकमेव पर्याय आहे असे म्हणाले.

याप्रसंगी उपस्थित ग्रामविकास अधिकारी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शिक्षक, कृषितज्ञ दीपक गायकवाड, स्वराज दुनिया आणि सत्ता तंत्रचे संपादक श्री शिवाजी बबन खेडकर, जितेंद्र साळुंखे (शिरूर), कैवल्य बोरकर (केंदुर), शिवराम भालेराव, साहेबराव भाकरे, योगेश भाकरे (टाकळी हाजी), बाळकृष्ण मते (पुणे), संकेत खेडकर (रांजनगाव), गुलाब नवले, नीलेश नवले राजेंद्र ढमढेरे, सतीश ढमढेरे, पोपट जगताप, राहुल गवारे सर्व तळेगाव ढमढेरे. संजय भुजबळ (शिक्रापुर), विवेक पवार, अजिंक्य हरगुडे, महेश डुके, तसेच ग्रामविकास अधिकारी सुनीता खेडकर, बाळासाहेब साकोरे, संभाजी नरवडे, विठ्ठल बडे, शुभम करेकर, विवेक वीर, मनीषा पाटील सर्व ग्राम विकास अधिकारी उपस्थित होते. अक्षय शेळके, दीपक सरोदे, सागर हळगुंडे, सचिन तपकिर, ज्ञानेश्वर कोरडे, जगगनाथ डोंबळे, जणार्धन पांढरमिसे (इंदापूर), शिवाजी चोरमले (मुंबई), सुरेश लोखंडे (मुंबई), राजकुमार कांबळे (छत्रपती सांभाजीनगर) व महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. तसेच विवेक वळसे, नितीन पवार, तेजस फडके, पोपट राव पाचंगे, प्रमोद लांडे सर्व पत्रकार उपस्थित होते. अनिल अमळनारदकर, अमोल अमळनारदकर, इत्यादि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार दीपक गायकवाड (कृषीतज्ञ) यांनी मांडले व कार्यक्रमाची राष्ट्रगीताने सांगता झाली.

---

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रगत कचरा व्यवस्थापनाची कोयंबतूर महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून प्रशंसा!

- **ऊर्जा निर्मिती, कचरा संकलन आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाबाबत सविस्तर माहिती**

**पिंपरी :** शहरी स्थानिक संस्था (युएलबी) यांची कार्यक्षमता वाढविणे, संस्थात्मक शिक्षणाला चालना देणे आणि अत्याधुनिक प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनिक अनुभव समृद्ध करण्याच्या उद्देशाने नुकतेच पिंपरी चिंचवड महापालिकेला कोयंबतूर महापालिकेच्या प्रतिनिधींनी भेट दिली. या भेटीद्वारे अधिकाऱ्यांनी वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन, वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन आणि स्वच्छता व्यवस्थापनातील 'ऑपरेशन अँड मेंटेनन्स' कामकाजाचे व्यापक निरीक्षण केले. कोयंबतूर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अनामिका रमेश (भा.प्र.से.), मुख्य अभियंता थिरू विजयकुमार यांच्यासह सदर अभ्यासदौऱ्यात कोयंबतूर महापालिकेच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. या भेटीदरम्यान पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अत्याधुनिक वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या स्थळावर पाहणी करण्यात आली. या प्रकल्पात कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती, संकलन ते विल्हेवाट प्रक्रियेतील यंत्रणा, तसेच पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर कसा केला जातो, याचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. पिंपरी चिंचवड महापालिकेचे कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले तसेच वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प सल्लागार प्रतिनिधी स्वरूप लागारे यांनी सदर प्रकल्पाबाबत कोयंबतूर महापालिकेच्या प्रतिनिधींना माहिती दिली. वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाचे केलेले व्यवस्थापन, स्वच्छता आणि तांत्रिक अंमलबजावणी पाहून विशेषतः कोयंबतूर महापालिकेच्या प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले. प्रकल्पातील प्रत्येक प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध व व्यवस्थितपणे राबविण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. उपस्थित अधिकाऱ्यांनी दिलेले सविस्तर मार्गदर्शन, तांत्रिक माहितीची स्पष्ट मांडणी आणि संपूर्ण प्रकल्पाबाबत दाखवलेली पारदर्शकता यांचेही त्यांनी कौतुक केले. या भेटीमुळे महापालिकेच्या कार्यक्षमता, समन्वय आणि प्रगत शहरी व्यवस्थापनाचा उत्कृष्ट अनुभव मिळाल्याचे प्रतिनिधींनी सांगितले. पाहणीदरम्यान प्रशासकीय आणि तांत्रिक अनुभवांची देवाणघेवाण करण्यात आली. तसेच दोन्ही महापालिकांदरम्यान भविष्यातील सहकार्याच्या नव्या मार्गांना यामुळे चालना मिळाली आहे.

---

## सार्वत्रिक निवडणूकीचे अनुषंगाने प्रारुप मतदार यादीवर प्राप्त होणा-या सूचनांची गांभिर्याने दखल घ्या

**पिंपरी** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रारुप मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ठ होणा-या संबंधित विधानसभा क्षेत्रांच्या दिनांक १ जुलै २०२५ अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीवरुन महानगरपालिकेची प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी गुरुवारी २० नोव्हेंबर २०२५ रोजी मतदार यादी कक्ष तसेच आठ क्षेत्रीय कार्यालयात आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना स्विकारण्यासाठी २७ नोव्हेंबर पर्यंत मुदत देण्यात आली आहे. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती सूचना आणि आक्षेपांची गांभिर्याने दखल घ्यावी असे निर्दे श निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले आहे. पालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आज आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते.

---

## ग्रामस्वराज्यं सप्ताह निमित माहिती अधिकार आणि ग्राहक अधिकार विवेक वेलनकर यांचे मार्गदर्शन

रांजणगाव महागणपती येथे चालू असलेल्या ग्रामस्वराज सप्ताह महोत्सव ला महाविद्यालयीन विदयार्थी व ग्राहक पंचायत कार्यकर्ते यांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

श्री. विवेक वेलणकर यांनी नागरिकांना माहिती अधिकाराचे महत्व, शासनातील पारदर्शकतेसाठी ठढख कसा प्रभावी ठरतो, ग्राहक संरक्षण कायदा, तसेच सामान्य नागरिकांनी दैनंदिन जीवनात आपले हक्क कसे सुरक्षित ठेवावेत याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी ठढख अर्जाची रचना, माहिती मिळवताना होणाऱ्या सामान्य चुका, तसेच अधिकारी-कर्मचारी यांच्याशी संवाद साधताना पाळावयाच्या पद्धती यावर प्रात्यक्षिक उदाहरणांसह मार्गदर्शन केले.

यानंतर श्री. अमरनाथ जी यांनी ग्रामस्वराज्य, ग्रामोद्योग, स्वावलंबी गावांची संकल्पना, स्थानिक उत्पादनांवर आधारित उद्यम, तसेच ग्रामस्तरावरील लोकसहभाग कसा वाढवावा यावर प्रभावी मार्गदर्शन केले. ग्रामविकासाचा खरा केंद्रबिंदू ग्रामपंचायत आणि नागरिकांमधील सुसंवाद असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री सच्चिदानंद जी निसर्गोपचार पद्धतीवर बोलताना म्हणाले, आहार एक औषधी है और उपवास महाऔषधी है ! इसलीये हम सबको हर १५ दिन मे आने वाली एकादशी का व्रत करना चाहिये! तर श्री बसवेकर सर यांनी माहिती अधिकार कार्यकरत्यांनी संघटित होऊन सामूहिक भ्रष्टाचार निर्मूलनाचे कार्य करावे. विविध क्षेत्रातील संघटनांनी एकत्र येऊन समाजातील व प्रशासनातील भ्रष्टाचार निर्मूलनाचे कार्य हाती घ्यावे असे स्वराज दुनिया चे संपादक श्री शिवाजी खेडकर यांनी आव्हान केले.

याप्रसंगी उपस्थित ग्रामविकास अधिकारी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शिक्षक, श्री रामदास बत्ते, दत्तू शिर्के (श्रीगोंदा), काळूराम दोरगे (टाकळी भीमा), प्रकाश जगताप (तळेगाव ढमढेरे), शुभांगी पोळ ( ग्रामविकास अधिकारी), राणी रासकर (ग्रामविकास अधिकारी), गणेश लाड (मुंबई), यन. पी. वैद्य ( पाबळ), व्ही. बी. करपे ( न्हावरे ), राजेंद्र विधाटे (निमगाव म्हाळुंगी), लता



चितळकर (सोने सांगवी), प्रल्हाद इंगळे (आर्णी), सपना शिंदे (वरुडे), मंगल लगड ( वाजेवाडी), भारती गव्हाने (संविदणे), व्ही . डी . आव्हाड, चिंतामण ढमढेरे, पंडित भुजबळ (तळेगाव ढमढेरे ), चंद्रकांत चौंडकर (पुरंदर) नवनाथ डोभाळे (कोंढापुरी), महेंद्र बगाटे (मुंबई) शिवाजी जाधव (केंदूर), तुकाराम भागवत (पुरंदर), शाम मोरे (पुणे), विठ्ठल शेलार (चिखली) लता ठुबे (जातेगाव), शांताराम पाडळे (कारेगाव), ए. यम. बळे (खैरेवाडी), हनुमंत जाधव (चिखली), दत्तात्रय सातपुते ( धानोरी), पंकज ढगे, रूपाली ढगे (शिक्रापूर), राहुल बांदल ( करडे), शांताराम शेलार (रायगड), दत्तात्रय कुंभार (विठ्ठलवाडी), दिपाली वाघोले (जातेगाव ), स्वाती सोनवणे (पिंपळे खालसा), निलेश केवट (पिंपरी चिंचवड, पुणे), अमर सातघरे ( राळेगाव), अंकुश गोरे (मुळशी), दिनकर चौघुले (कोल्हापूर ), डी. यन. पलांडे (बुरुंजवडी), धोंडूभाई मुलानी ( मलठण ), के. बी. घासले ( कान्हूर मेसाई), एल. एस. कराळे ( करडे ), अभिषेक देवकर, विनायक शेळके, नीलेश शिंदे (रांजनगाव), इत्यादि उपस्थित होते. कृषितज्ञ दीपक गायकवाड यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. कार्यक्रमाच्या अंती श्री राजेंद्र विधाटे यांनी आभार मानले. आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली कार्यक्रमाचा दूसरा दिवस ग्रँड विस्ता हॉटेल हॉलला उत्साहात पार पडला.

---

## सार्वजनिक स्वच्छतेत नियमभंग करणांवर महापालिकेची कडक दंडात्मक कारवाई

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेने सार्वजनिक स्वच्छतेविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत 'फ' क्षेत्रीय कार्यालयाने १ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध नियमभंग करणाऱ्यांकडून एकूण १ लाख ६० हजार ७०० रुपये इतका दंड वसूल केला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व आरोग्य कार्यकारी अधिकारी तथा सहा. आयुक्त अमित पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच 'फ' क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई राबवण्यात आली.

शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी करण्याच्या दिशेने महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. नागरिकांनी कचरा विलगीकरणाबाबत जागरूक राहावे यासाठी क्षेत्रीय कार्यालयांमार्फत जनजागृती उपक्रम मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. 'फ' क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी नियमभंगाविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार उघड्यावर कचरा टाकणे, प्लास्टिकचा वापर, कचरा वर्गीकरण न करणे, दुकानदारांकडे दोन डस्टबिन न ठेवणे, सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकणे अशा नियमभंगांवर कारवाई करून दंड वसूल करण्यात आला.

या धडक कारवाई मोहिमेत सहा. आरोग्य अधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक कांचनकुमार इंदलकर, आरोग्य निरीक्षक गौरव दराडे, महेंद्र साबळे, समाधान कातड, रामचंद्र शिंगाडे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**'फ' क्षेत्रीय कार्यालयाची दंडात्मक कारवाई**

**(कालावधी : १ नोव्हेंबर २०२५ ते १७ नोव्हेंबर २०२५)**

- **बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर - ८५ हजार रुपये**
- **कचरा वर्गीकरण न करणे - १२ हजार ७०० रुपये**
- **उघड्यावर कचरा टाकणे - ३४ हजार रुपये**
- **दुकानांमध्ये दोन डस्टबिन न ठेवणे - २६ हजार रुपये**
- **सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकणे - ३ हजार रुपये**